The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
=================================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
-----------------------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue 3; March 2024
=================================================================

# संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिकता

**प्रा.डॉ.कांत जाधव**
मराठी विभागप्रमुख
पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी जि.लातूर.

'जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा'

संत तुकारामांनी अशा शब्दात समस्त मानवी जीवनाची जणू व्याख्याच केली आहे. मानवाच्या आध्यात्मिक आणि सामाजिक कल्याणासाठी स्वत:चे जीवन खर्च केले, म्हणून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासात संत तुकारामांचे स्थान अग्रभागी आहे. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांनी उभारलेल्या वारकरी संप्रदायातील भक्तिमंदिराच्या कळसाची उपमा दिली जाते. संत तुकारामांची अभंगवाणी लोकांच्या मनात घर करून आहे. त्यांना समाजातील वाईट प्रवृत्तीचे चटके बसले होते. त्यांच्या संवेदनशील मनाने समाजाला ऐक्याची आणि शांततेची शिकवण दिली. कारण समाजात अपप्रवृत्ती वाढत होती. या परिस्थितीला माणसाचे मन कारणीभूत आहे हे ओळखून समाजजागृतीचा विचार केला आहे. म्हणूनच संत तुकारामांची अभंगवाणी सर्वसामान्य माणसांच्या हृदयाला जाऊन भिडते.

संत नामदेव, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकारामांसह सर्वच संतांनी अभंग, कीर्तन, प्रवचन या माध्यमातून समाजप्रबोधन आणि उद्‌बोधन केले. संत आणि समाज यांचे दृढ नाते आहे. समाजाच्या अडी-अडचणी, समस्या, दु:ख आणि अपेक्षा याबद्दलचा जनसामान्यांचा अनुभव हा स्वत:चा अनुभव समजून संतांची अभंगवाणी ही आशय, अभिव्यक्ती आणि प्रकटीकरण सर्वसामान्य माणसाला भावते. तुकारामांनी आध्यात्म आणि मानवी कल्याणाचा मार्ग एकाच वेळी सांगितला आहे. अंधश्रद्धा, कर्मकांड आणि बहुदेवतावाद यासारख्या थोतांड कल्पनेला विरोध करून मानवी जीवन उन्नत करणारा आध्यात्मिकतेचा आणि सामाजिकतेचा विचार मांडला आहे. हेच तुकारामांच्या अभंगाचे मर्म आहे.

**सामाजिकता म्हणजे काय?**

सामाजिकता हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्याची एक आचारसंहिता आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाज यामुळे समाज आकाराला येतो. समाजरचनेची विशिष्ट चालीरिती, श्रद्धा आणि संकेत असतात. लेखकाची जडणघडण ज्या समाजात होत असते त्या समाजातील अनुभव आणि अवतीभोवतीच्या सामाजिक-सांस्कृतिक वातावरणाचा परिणाम आणि त्याचा लावलेला अर्थ यावरून त्याची जीवनाकडे पाहण्याची एक विशिष्ट दृष्टी असते. सभोवताली घडणाऱ्या सामाजिक घटना-प्रसंगांना तो साहित्यात मूर्त रूप देत असतो. यासंदर्भाने रा.ग. जाधव लिहितात, "साहित्याची सृजनशक्ती ही सामाजिक घटना-कल्पनांच्या रूपाने व्यक्त होते. म्हणून सामाजिकता व सृजनशक्ती यांच्या विधायक मिश्रणातूनच साहित्यिकांची साहित्यिकता सिद्ध होते. सामाजिकतेशिवाय साहित्य व साहित्यिक हे संभवतच नाहीत."[१]

'Theory of Literature' चा अनुवाद करताना स.ग. मालशे लिहितात, "साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे व समाजनिर्मिती भाषा हे त्याचे माध्यम आहे."[२] सहित्यात भाषेला विशेष महत्त्व आहे. लेखक ज्या भाषेच्या वातावरणात आणि परिसरात राहतो त्याचा प्रभाव लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर पडतो. तेच साहित्यात उमटत असते. त्या व्यक्त होणाऱ्या साहित्याला सामाजिक संदर्भ असतो.

साहित्याचा सामाजिक दृष्टीने जेव्हा आपण विचार करतो तेव्हा त्यातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवेवर भर दिला जातो. संत तुकारामांसह सर्वच संत सामाजिक विचार मांडत होते. ते ज्या जीवनात वावरत होते त्या जीवनाशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. त्यांनी अतिशय बारकाईने न्याहाळलेले समाजजीवन आपल्या साहित्यातून मांडले आहे. समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी परंपरा अशा घातक असणाऱ्या प्रवृत्तीवर संतांनी परखडपणे आसूड ओढलेले आहेत. संत तुकाराम हे सामाजिक जीवनात कसे वावरले, समाजाशी त्यांचा असलेला संबंध अभंगातून स्पष्ट करताना सामाजिक जाणिवा कशा स्पष्ट होत जातात याचा सामाजिक अंगाने धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संत साहित्यातील सामाजिकता :**

ज्या काळात आणि ज्या परिस्थितीत ही संतांची कविता लिहिली गेली त्या काळातील त्यांच्या कवितेचे स्वरूप आध्यात्मिक, पारमार्थिक होते यात कसलीही शंका नाही. या कवितेचे सामाजिक दृष्टीने महत्त्व काय? सामाजिक घडामोडींशी या कवितेचे नाते काय? यासारखे प्रश्न जेव्हा निर्माण होतात तेव्हा भक्तीचा प्रसार करताना सामाजिक नितीमूल्यांची जोपासना केल्याचे जाणवते. संपूर्ण वारकरी संप्रदायाची भूमिका पाहता असे लक्षात येते की, तेराव्या शतकात सर्व जाती-जमातीतील लोकांना एकत्र घेऊन विठ्ठल भक्तीपर वारकरी संप्रदायाचे स्थान भक्कम केले. संत ज्ञानेश्वरांनी भगवद्गीता ही ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून सामान्यांसाठी सोपी करून सांगितली. नामदेवांनी कीर्तन आणि अभंगाच्या माध्यमातून नवीन विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविले. संत चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, कर्ममेळा ह्या संतांनी धर्मसुधारणेबरोबरच सामाजिक विषमतेविरुद्ध भावना व्यक्त केली आहे. संत एकनाथ हे सामान्य माणसांचे लोकशिक्षक होते. तर तुकारामांची अभंगवाणी म्हणजे भविष्यातील क्रांतीची नांदी ठरत आहे. तुकारामाची वाणी आणि बाणा इतका प्रखर आणि तेजस्वी होता की, कोणतीच अधम प्रवृत्ती त्यांच्या तडाख्यातून सुटली नाही.

संत नामदेव, ज्ञानेश्वरांसह संत तुकारामांनी वारकरी संप्रदायामार्फत सामाजिक विचार मांडले आहेत. आपल्या लेखणीतून संत साहित्याची चळवळ उभी केली. संतांचे वाङ्मयीन आणि सामाजिक कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजाबद्दलची जाणीव मांडली. यासंदर्भात भालचंद्र नेमाडे म्हणतात, "वारकरी चळवळीचे आध्यात्मिक आणि वाङ्मयीन कर्तृत्व तर मोठे आहेच; पण मुख्य म्हणजे जो सामाजिक बदल तिला अभिप्रेत होता तोच तिच्या संघटनेचा आधारही होता."[३] संतांनी वारकरी संप्रदायाची आचारमूल्ये समाजात रूजवली. धार्मिक आणि सामाजिक जागृतीसाठी कीर्तन या लोकमाध्यमांचा वापर केला. तत्कालीन समाजात उच्च-नीच भेदभाव, जातीभेद, वर्णव्यवस्था, अंधश्रद्धा, दांभिक प्रवृत्ती, वृत्तवैकल्ये यासारख्या समाजात अवडंबर माजवणाऱ्या आणि अध:पतनाकडे

घेऊन जाणाऱ्या गोष्टींचा प्रभाव वाढला होता. अशा कर्मठ आणि व्यवहारिक प्रवृत्तीवर सर्वच संतांनी हल्ला चढवला आहे. सामाजिकदृष्ट्या वाया चाललेल्या समाजाला जागृत करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. समाजातील जातीभेद, वर्णव्यवस्था, कर्मकांड यासारख्या सामाजिक गोष्टी मिटवण्यासाठी वारकरी संप्रदाच्या तत्त्वाचा उपयोग झालेला आहे. थोडक्यात संत तुकारामांच्या अभंगाचा सामाजिक दृष्टीने अभ्यास केल्यास सामाजिकता ही विविध अंगांनी आलेली पहावयास मिळते. याचाच धांडोळा घेतलेला आहे.

**संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिकता :**

संत तुकारामांचा जन्म १५९८ साली देहू या गावी शुद्र जातीत मोडणाऱ्या कुळात झाला. वयाची बेचाळीस वर्ष मानवाच्या आत्मिक आणि सामाजिक कल्याणासाठी खर्च केले आहेत. विठ्ठलभक्तीत लीन झालेल्या संत तुकारामांना लहान वयातच दु:ख आणि आपत्तीचा सामना करावा लागला. दुष्काळ पडला. बायको मरण पावली. दुकानाचे दिवाळे निघाले. ही वाताहत त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिली. आकस्मिक कोसळणारी आपत्ती, दु:ख, चिंता आणि अपमान यामुळे निराश झालेले संत तुकाराम विरक्त होऊन एकांत वासी झाले असता हळूहळू ईश्वर भक्तीत रमू लागले. संत नामदेवामुळे अभंग निर्मितीची स्फूर्ती मिळाली. त्यांचे पाच हजार अभंग उपलब्ध आहेत. मराठी सारस्वतात या अभंगाला मान स्थान प्राप्त झाले असून सर्वसामान्याच्या हृदयाला जाऊन भिडले आहेत.

प्राचीन काळापासून समाजव्यवस्था ही ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्गात विभागली गेली होती. ही संपूर्ण व्यवस्था ब्राह्मणाच्या हाती होती. ब्राह्मण हाच सर्वश्रेष्ठ होता. त्यांना देव मानावे अशी व्यवस्था केली जात होती. त्यामुळे विषमता आणि अस्पृश्यता वाढत होती. या व्यवस्थेविरुद्ध अनेक वेळा विविध संप्रदायांनी बंड केले. परंतु इतर संप्रदायाच्या तुलनेत वारकरी संप्रदाय सर्वसमावेशक तत्त्वामुळे अधिक लोकप्रिय होत गेला.

संत तुकारामांनी समाज आणि माणूस डोळ्यांसमोर ठेवून अभंग लिहिले आहेत. समाजाच्या बदलाची अपेक्षा त्यांनी अभंगातून मांडली आहे. समाजातील अज्ञान, अंधकार, अंधश्रद्धा, कर्मकांड अनिष्ट प्रवृत्ती यावर ते प्रहार करतात. यासंदर्भात डॉ.किशोर सानप म्हणतात, "तुकारामाचे कीर्तन आणि कवित्व करून वर्णाभिमानाविरहित समाजाची रचना करण्याचा प्रयत्न केला. वारकरी संप्रदायानी सामान्य माणसाला स्वातंत्र्याचा मूलमंत्र दिला. समाजातील शूद्रवृत्ती आणि प्रवृत्तीवर कठोर प्रहार केले. प्रपंच आणि परमार्थाची सांगड घातली."[४] संत तुकारामांचे हे वेगळेपण आहे. जातीभेद ही समाजव्यवस्थेला लागलेली कीड आहे ती दूर करण्यासाठी समतेचा आचार-विचार हाच नीती धर्म आहे अशी भूमिका घेतली. हे सांगताना म्हणतात,

'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म
भेदाभेद भ्रम अमंगळ'

जगातील सर्वच गोष्टी व वस्तू या विष्णुमय आहेत. मग भेदभाव मानणेच हे अपवित्र आहे. भेदभाव, जातिभेद करणे ईश्वराजवळ नाही, त्याला सर्व समान आहेत हेच संत तुकारामांनी अनेक अभंगातून पटवून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

संत तुकारामांनी समाजातील अन्याय-अत्याचार आणि दांभिक प्रवृत्तीची वास्तविकता स्पष्ट करून सांगण्यासाठी जीवाचा आटापीटा केला कुणाचीही भाडभिड ठेवली नाही. साधू-संतांचा आव आणणाऱ्या लोकांचा खोटेपणा उघड केला आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये साधू संतांचा सुळसुळाट झाला होता. साधूपणाच्या नावाखाली भोंदू लोक समाजाची पिळवणूक करत होते. भगवे वस्त्र परिधान करणे, जटा वाढविणे अशा वागण्यामुळे काही साधुत्व येत नाही याविषयी पुढील अभंगतातून ते सांगतात-

"ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनि म्हणती साधु।।१।।
अंगा लावूनिया राख। डोळे झाकूनी करिती पाप ।।२।।
दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयाचा सोहळा।।३।।
तुका म्हणे सांगो किती। जळो तयांची संगती ।।४।।"

अशा प्रकारे ढोंगी साधू विषयीची चीड अभंगातून व्यक्त केली आहे. तसेच तत्कालीन समाजात अनाचार आणि गोंधळ कसा माजला होता, निंदा, द्वेष, खोटेपणा, अहंकार, अनाचार आणि दांभिकता इत्यादी दुर्गण समाजात कसे बळावले होते. या समाजस्थितीचे चित्रण संत तुकारामांनी केले आहे. यासंदर्भात बा.रं. सुंठणकर आपल्या ग्रंथात म्हणतात, "समाजाची ही स्थिती तुकारामाने भीडभाड न ठेवता अगदी चव्हाट्यावर मांडली आहे. त्याची गाथा म्हणजे तत्कालीन समाजस्थितीचा आरसा आहे. त्यात त्या वेळच्या समाजाचे प्रतिबिंब दृग्गोचर होते. समाजाची हीन अवस्था पाहून ती सुधारावी अशी तळमळ त्यांना लागली होती. तुकाराम हे महान दंभस्फोटक आणि समाजसुधारक होते. समाजाची नीती आणि दर्जा वाढवावा अशी तीव्र तळमळ त्याला होती."[१]

संत तुकारामांनी समाजवास्तवाचे चित्रण केले आहे. समाजात शुद्र देवतांच्या पूजेचे प्रस्थ वाढत होते. लोक अंधश्रद्धेवर विश्वास ठेवत होते. याच अंधश्रद्धेवर ते प्रहार करतात. संत तुकारामांची देवावर श्रद्धा होती परंतु शेंदरी दैवते त्यांना मान्य नव्हती. ही शेंदरी दैवतेच लोकांच्या अंधश्रद्धेचे कारण बनतात अशा दैवतांबद्दल प्रबोधन करताना म्हणतात,

'नव्हे जाखाई जाखाई। मायराणी मेसाबाई
बळिया माझा पंढरिराव। जोखा देवांचाही देव
रंडी चंडी शक्ती। मघामांसाते भक्षिती
बहिरव खंडेराव। रोटीसुटीसाठी देव।।'

अशा प्रकारे देवतांचे प्रस्थ संत तुकारामांनी उघड केले आहे. ज्या देवाला दारू मटणाचे नैवेद्य लागते तो देवच होऊ शकत नाही. देवाची कृपा होण्यासाठी बळी देण्याची गरज नाही. समाज हा देवतांच्या मागे लागला आहे. समाजाची सुटका होण्यासाठी विठ्ठल हाच सगळ्या देवांचा देव आहे, हे संत तुकारामांनी ठणकावून सांगितले आहे.

नवस सायासाला तुकाराम विरोध करताना म्हणतात की, "नवसे कन्या पुत्र होती। तरी का करणे लागे पति।" अशी भूमिका घेऊन समाजात बळावत चाललेल्या प्रवृत्तीला त्यानी कडाडून विरोध केला आहे. समाजजीवनातील प्रचलित रुढी-प्रथा आणि अंधश्रद्धेबद्दल कठोर शब्दामध्ये सुनावले आहे.

संत तुकाराम स्वत:विषयी जसे जागृत होते तसे समाजातील अनिष्ट प्रवृत्तीवर प्रहार करीत होते. त्याबद्दल डॉ.सदानंद मोरे म्हणतात, "स्वत:विषयी चोवीस तास जागरूक राहून आपली कठोर आत्मचिकित्सा करणारे तुकोबा समाजाविषयीही तितकेच जागरूक असतात व सातत्याने कोणाची भीडभाड न ठेवता समाजाचीही समीक्षा करीत असतात."[६] तुकारामाच्या कवितेचा परिप्रेक्ष्य विस्तारत होता. सामाजिक, सांस्कृतिक आणि तत्त्वज्ञानात्मक संदर्भ त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात.

संत तुकाराम यांचे समाजप्रबोधन फारच मौलिक होते. ते अतिशय परखड विचारांचे होते. त्यांना समाजातील जातीव्यवस्था मान्य नव्हती. ही जातीयता दूर करण्यासाठी प्रयत्न केला आहे. ही सर्व एकाचीच वीण असताना आपण आपल्यात भेदाभेद का करतो? आपला देह आणि दुसऱ्याचा देह यामध्ये कसलाच फरक नाही. मग माणसामाणसामध्ये भेद कशासाठी करायचा? असा प्रश्न उपस्थित करून सांगतात की, या सृष्टीची निर्मिती करताना कुठलाच भेदभाव केला नाही. हा विचार स्पष्ट करण्यासाठी अनेक उदाहरणे दिली आहेत. उदा. सूर्य, नदी, विहिर, दूध हे भेदभाव करीत नाहीत. जातीयता पाळत नाहीत. मग माणसा-माणसात हा भेद का केला जातो? देवाजवळ भेदभाव नाही तो भक्ताची जात पाहत नाही याविषयी म्हणतात,

"अठरा पगड जाती सकळी वैष्णव
दुजा नाही भाव पंढरीशी।"

आपण कुठल्याही कुळात, घरात, जातीत जन्मलो तरी आपण एकच आहोत. पांडुरंग दुजाभाव करीत नाही. संत तुकारामांच्या सामाजिक कार्याचे वर्णन करताना ग.बा. सरदार म्हणतात, "ज्या ज्या वेळी विषमतेबद्दलची चीड अनावर झाली, त्या त्या वेळी त्यांनी रुढ कल्पनांचे वाभाडे काढण्यास कमी केले नाही. सर्वमान्य संकेत आणि स्वतंत्र प्रेरणा यांच्या ह्या झगड्यात तुकारामांच्या जीवनाचे सार सर्वस्त आहे."[७] समाजातील सर्व जातीमध्ये ऐक्याची भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने संत तुकारामांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

संत तुकारामांनी विठ्ठल भक्तीचा प्रसार करताना सामाजिक नितीमूल्यांची जोपासना केली. सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या समाजाला जागृत करण्याचे प्रयत्न केले आहेत. आपले मन समाधानी असेल तरच देवाची कृपा असते. तेथेच देवाची सत्ता असते म्हणून ते म्हणतात,

"नाही निर्मळ जीवन। काय करील साबण।
तैसी चित्तशुद्धी नाही। तेथे बोध करील काई।
वृक्ष न धरी पुष्पफळ। काय करील वसंत काळ।"

संत तुकाराम म्हणतात की, आपले जीवन, मन स्वच्छ असेल तर साबणाचा उपयोग होतो. चित्त शुद्ध असेल तर उपदेशाचा उपयोग होतो. अन्यथा सर्व व्यर्थ आहे. मन निर्मळ असणे अतिशय गरजेचे आहे. अशा प्रकारे अनेक उदाहरणे देऊन भक्तीचा प्रसार केला आहे.

**समारोप :**

ज्या काळात संत तुकारामांनी अभंग लिहिले त्या काळातील अभंगाचे स्वरूप आध्यात्मिक आणि पारमार्थिक स्वरूपाचे होते यात शंका नाही. सामाजिकदृष्ट्या महत्त्व काय आहे, सामाजिक

घडामोडींशी नाते शोधण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्थापित वैदिक परंपरेला छेद देऊन नवीन विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविले आहेत. संतांनी वारकरी संप्रदायाची जोपासना करून सर्वसामान्य लोकांच्या भाषेतून समाजजागृती केली आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थिती पाहता समाजात कर्मकांडाला अत्यंतिक महत्त्व होते. उच्च-नीच भेदभाव, जातीभेद, वर्णव्यवस्था, अंधश्रद्धा, दांभिक प्रवृत्ती, व्रतवैकल्य आणि विविध दैवताची उपासना समाजाला अध:पतनाकडे घेऊन जात. अशा कर्मठ प्रवृत्तीवर संतांनी हल्ला केला आहे. सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या समाजाला जागृत करण्याचे कार्य संत तुकारामांनी केले आहे.

**संदर्भ**

१) रा.ग. जाधव, साहित्य व सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९६ पृ.७६
२) डॉ.तानाजी पाटील, संत साहित्यातील सामाजिकता, विश्वकर्मा पब्लिकेशन, प्र.आ.२०२१ पृ.१५
३) किशोर सानप, प्रा.मनोज तायडे, तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व, लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती २००६ पृ.२२
४) भालचंद्र नेमाडे, टीकाव्यस्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ.३४
५) सुगठणकर बा.रं., महाराष्ट्रीय संत मंडळीचे ऐतिहासिक कार्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९४ पृ.९२
६) सदानंद मोरे, तुकाराम दर्शन, गाज प्रकाशन, अहमदनगर, प्र.आ.१९९६ पृ.५४
७) ग.बा. सरदार, संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, पृ.११५